महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**अति उच्च दाब बांधकाम नि संवसु परिमंडळ पुणे**

---

# अपंगासाठी विशेष भरती मोहीम

## जाहिरात क्र.एचआर ०१/२०११ (सुधारीत)

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या मुख्य अभियंता,अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांसाठी खालील नमुद केलेली रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरावयाची असून त्याकरीता अर्हता पात्र अशा अपंग गटातील उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ .क्र | पदाचा कोड क्र. | पदाचे नाव | पदाची वेतन श्रेणी | एकूण रिक्त पदे | पदे ज्या अपंग प्रवर्गासाठीभरावयाची आहेत त्याचे विवरण | | | शारिरीक पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दृष्टी अपंगत्व Visually Handicap | कर्णबधीर Hearing Handicap | अस्थीव्यंग Orthopedic Handicap | |
| | | | | | अंधत्व/ क्षीणदृष्टी (Blindness/ Low Vision) | श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impaired) | चलनवलन विषयक विकलांगता/ मेंदूचा अर्धांगवायु (Locomotor Disability Cerebral Palsy) | |
| २ | ०२ | कनिष्ठ तंत्रज्ञ (प्रशिक्षणार्थी) तंत्रज्ञ श्रेणी-४ पुर्ननामांकन | ₹ ८०४०–१५५–८८१५– –१८५–१०६६५–२२०– –१५७२५. | ०३ | ०१ क्षीणदृष्टी | ०१ कर्णबधीर | ०१ एक हाताने अपंग | बसून, उभे राहून, फिरून, हातांच्या बोटांनी कामे करणे, |

## शैक्षणिक अर्हता व अनुभव

| अ.क्र | पदाचा कोड क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २ | ०२ | कनिष्ठ तंत्रज्ञ (प्रशिक्षणार्थी) तंत्रज्ञ श्रेणी-४ पुर्ननामांकन | शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पुर्ण झालेवर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून देण्यात येणारे वीजतंत्री/तारतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र **किंवा** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत वीजतंत्री (Electrician)/तारतंत्री (Wireman) या व्यवसायाचा पाठयक्रम पूर्ण झालेवर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या संस्थेकडून देण्यात येणारे राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र. | अनुभवाची आवश्यकता नाही. असल्यास प्राधान्य. | विद्युत वाहिनी देखभाल, विद्युत वाहिनी उभारणी, विद्युत उपकरणांची दुरूस्ती, विज जोडणी इ. |

## अटी व शर्ती

१. अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराकडे अपंग व्यक्ती समान संधी, संपूर्ण सहाभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ मध्ये 'अपंगत्वाच्या' दिलेल्या व्याख्येप्रमाणे (Definiation of Disabilities) संबंधीत अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा कमी नाही असे सक्षम समिती अथवा बोर्डाने अथवा वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहाभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील तरतुदीप्रमाणे अपंगत्वाच्या प्रवर्गातील आंतर–परिवर्तणीयबाबत (Inter Se Exchange) कार्यवाही करण्यात येईल.

३. **वयोमर्यादा** – अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. एस.एस.सी परिक्षेचे प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला यावार असलेली जन्मतारीख व दिनांक **३०.११.२०११** रोजी असलेले वय अर्जात नमूद करावे. म.रा.वि.पारेषण कंपनीतील पात्र अशा अपंग कर्मचाऱ्यांसाठी/उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू रहाणार नाही.

४. उमेदवार हा भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा (त्यासाठी शासनाने प्रधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असावे.

५. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी पासपोर्ट साईजचा फोटो लावावा.

६. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,वय,अनुभव,जातीचा दाखला,जाती वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, अपंगत्वाचा दाखला तसेच आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रीत अधिकारी/पोस्ट मास्टर,मुख्याध्यापक,प्राचार्य यांनी अथवा याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने केलेले असावे.

७. विहीत वयोमर्यादेतील व पात्र अशा शासकीय/निमशासकीय सेवेतील/शासकीय उपक्रमातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत पाठवावेत. अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पुर्वीच्या संस्थेच्या/कंपनीच्या सेवेमधून कार्यमुक्त केल्याचे प्रमाणपत्र रुजू होतेवेळी आवश्यक राहील. मात्र त्यांच्या पुर्वीच्या संस्थेच्या/कंपनीच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

८. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे एक आवश्यक बाब म्हणून 'लहान कुटूंब' असल्याचे प्रतिज्ञापन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमूद केलेली अथवा अर्जासोबत दिलेली कागदपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास अथवा तयांचे पूर्वचारित्रात गैर असल्याचे आढळून आल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१०. अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख **३० नोव्हेंबर,२०११** रोजी **सायंकारी ५.३० वाजेपर्यत** असेल.

११. उमेदवाराने यापूर्वी त्याचे नाव रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात,सेवायोजन कार्यालयांत,एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय,जिल्हा सैनिक कार्यालय येथे नोंदवले असले तरी त्यांनी या जाहिरातीला अनुसरुन स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी क्रमांक अर्जात नमुद करावा.

१२. पात्रता धारक उमंदवाराने खाली विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज पांढऱ्या जाड कागदावर एकाच बाजूस टंकलिखित/संगणकीकृत अथवा सुवाच्य हस्ताक्षरात भरलेला असावा व या अर्जावर नमुद केलेल्या ठिकाणी उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा अलिकडील काळात काढलेला फोटो चिकटवून सदर फोटोवर उमेदवाराने सही करणे आवश्यक आहे.

१३. परिपुर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह '**पोस्ट बॅग क. ००३, कसबा पेठ पोष्ट ऑफिस, पुणे ४११०११** येथे दिनांक **३० नोव्हेंबर,२०११ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त (अर्ज पोहचण्याचा अंतिम दिनांक)** साध्या पोस्टाने पोहोचेल या हिशोबाने पाठवावा. विहीत मुदत संपल्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव टपाल कार्यालयाकडून झालेला विलंब अथवा इतर कोणताही विलंब वगैरे विचारात घेतले जाणार नाही.

१४. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अशा माजी सैनिकांनीच अर्ज करावेत. जिल्हा सैनिक अधिकारी कार्यालय येथील नोंदणी क्रमांक व नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५. सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या **जातीच्या दाखल्यासोबतच** सक्षम जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **'जाती वैधता प्रमाणपत्र'** अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूची जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागास प्रवर्गातील म्हणजे विमुक्त जाती—अ, भटक्या जमाती—ब, भटक्या जामती—क, भटक्या जामती—ड, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलिअर) तत्व लागू केले आहे. त्यामुळे या प्रवर्गातील उमेदवाराने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दि. ०१.०४.२०११ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

१७. अपंगांसाठीचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने या आरक्षणांतर्गत निवड झालेले पात्र उमेदवार हे त्या त्या पदाचा अनुशेष निहाय आरक्षणाखाली उदा.अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती 'अ', भटक्या जमाती' ब', भटक्या जमाती' क', भटक्या जमाती 'ड' , विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासप्रवर्ग अथवा खुल्या प्रवर्गातील राखीव ुजागांवर दर्शविण्यात येईल.

१८. या जाहिरातीला अनुसरुन, यापुर्वी विहीत मुदतीत व शैक्षणिकृष्ट्च्या पात्र उमेदवारांनी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील. त्यांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

१९. भरती प्रक्रिया व निवड करण्याची पध्दत या बाबत कंपनीचा निर्णय अंतिम असेल. व्यवसाय चाचणी/लेखी परिक्षा घेवून त्यात मिळालेल्या गुणांच्या आधारावर तोंडी मुलाखतीसाठी छाननी यादी (Short List) करुन त्या यादीतील उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. व्यवसाय चाचणी/लेखी परिक्षते मिळालेले गुण व मुलाखतीत मिळालेले गुण यांच्या आधारावर उमेदवारांची निवड करण्यात येईल. व्यवयास चाचणी/लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांचे अधिक्य (Weightage) हे जास्त राहणार.

२०. अंध क्षीणदृष्टी,अस्थिव्यंग व मेंदूच्या अर्धांगवायूने बाधित झालेल्या व्यक्ती लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास अशा उमेदवारांना लेखनिकाची आवश्यकता आहे का याचा उल्लेख त्याने अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास लेखनिकाची व्यवस्था उमेदवार स्वत: करणार आहे की, कंपनीने व्यवस्था करावी याचाही उल्लेख उमेदवाराने अर्जाद नमुद करावा. उमेदवार लेखनिकाची व्यवस्था स्वत: करणार असल्यास लेखनिक व स्वत: उमेदवार हे एकाच शाखेचे असल्यास लेखनिक हा उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा. ते भिन्न शाखेचे असल्यास अट लागू राहणार नाही. उमेदवार व लेखनिक एकाच शाखेचे असल्यास तो उमेदवारापेक्षा उच्च अर्हताधारक नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल. लेखनिक हा उमेदवारापेक्षा उच्च अर्हताधारक असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची उमेदवारी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच लेखनिकाने परिक्षेच्यावेळी गैरप्रकार केल्याचे उघडकीस आल्यास, त्याची जबाबदारी उमेदवारावर राहील.

२१. जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत /अपंगाच्या आरक्षणात बदल होऊ शकतो. असा बदल झाल्यास त्याबाबत जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने अथवा उमेदवारास व्यक्तीश: वेगळा खुलासा करण्यात येणार नाही.

२२. जाहिरातीत नमुद केलेल्या पदासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने विहित शैक्षणिक अर्हता,अनुभव, वय,प्रमाणपत्रे वगैरे बाबी धारण केलेल्या आहेत याची खात्री करुनच अर्ज करावा.

२३. व्यवस्थित भरलेले अर्ज लिफाफ्यात टाकून पाठविताना उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव व त्याचा कोड क्रमांक त्या लिफाफ्याच्या वरच्या भागात मध्यभागी स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे.

२४. भरती प्रक्रियेत उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रचार/हस्तक्षेप करण्याचा अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२५. निवड झालेल्या उमेदवारास या परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार नियुक्ती देण्यात येईल. त्यास नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहिल.

२६. सदर भरतीसेवा ही फक्त अपंग उमेदवारासाठी असल्याने सर्वसाधारण उमेदवाराने केलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत.

२७. अर्जाचा नमुना खाली दिला असून उमेदवारांनी सदर नमुन्यातच अर्ज सादर करावा.

२८. निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीची विधी ग्राहयता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षापर्यन्त राहील. त्यानंतर ही निवड सूची कंपनीच्या नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

मुख्य अभियंता,
अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ,पुणे

## अपंगासाठी विशेष भरती मोहीमेअंतर्गत म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या मुख्य अभियंता, अ.उ.दा. बांधकाम नि संवसु परिमंडल,पुणे या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन करावयाचा अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी. |

१. पदाचे नांव :

२. पदाचा कोड :

३. उमेदवाराचे पूर्ण नाव :

(आडनाव) (स्वतःचे नाव) (वडिलांचे/ पतीचे नाव)

४. उमेदवाराचे इंग्रजीतून पूर्ण नाव : ________ ___________ ___________________

(Surname) (Candidates Name) (Father's / Husband's Name)

५. लिंग व वैवाहिक स्थिती (लागू असलेल्या ठिकाणी ☑ अशी खूण करावी) :

☐ स्त्री ☐ पुरुष ☐ विवाहीत ☐ अविवाहीत

६. अपंगत्वाचा तपशील (लागू असलेल्या ठिकाणी ☑ अशी खूण करावी :

| ☐ | ☐ | ☐ |
|---|---|---|
| प्रकार (जसे की, दृष्टी अपंगत्व कर्णबधीर अस्थिव्यंग) (VH), (HH), (OH) | स्वरुप (जसे की, अंध, क्षीणदृष्टी, कर्णबधीर, एक हात, एक पाय, दोन्ही पाय, दोन्ही हात वगैरे) | अपंगत्वाचे प्रमाण / टक्केवारी / तपशील |

सक्षम वैद्यकीय समिती / मंडळ / अधिका-याने प्रमाणित केलेले अपंगत्वाचे साक्षांकित प्रमाणपत्र सोबत जोडले आहे का ? :

☐ होय ☐ नाही

८. अर्जदाराजवळ जाहिरातीत नमूद केलेली शारिरीक पात्रता आहे का ? :

☐ होय ☐ नाही

९. क) अंध/क्षीणदृष्टी, अस्थिव्यंग व मेंदूचा अर्धांगवायूने बाधीत असलेल्या उमेदवारास लेखनिकाची आवश्यकता आहे का ? : ☐ होय ☐ नाही

ख) आवश्यकता असल्यास लेखनिकाची व्यवस्था तो स्वत: करणार आहे कि कंपनीने करावयाची आहे : ☐ स्वत: ☐ कंपनीने

ग) स्वत: करणार असल्यास लेखनिकाची विस्तृत माहिती

१) संपूर्ण नांव ____________________

२) व्यवसाय ____________________

३) पूर्ण पत्ता ____________________

४) शैक्षणिक पात्रता ____________________

१० उमेदवाराचा सध्याचा पत्ता ____________________

____________________

____________________

| पिन कोड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

११. उमेदवाराचा कायमचा पत्ता : ____________________

____________________

| पिन कोड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

१२. दूरध्वनी/मोबाईल क्र. : कोड - दूरध्वनी क्र. ________ मोबाईल क्र. ________

१३. ई-मेल :

१४. जन्म दिनांक :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | | महिना | | वर्षे | |

१५. वय (अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशीचे म्हणजे दिनांक १५.११.२०११ रोजीचे)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्षे | | महिने | | दिवस | |

१६ महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (डोमीसाईल्ड) आहात काय ? : ☐ होय ☐ नाही

१७. जातीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी ☑ अशी खूण करावी)

| अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खूला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | OPEN |
| | | | | | | | | |

अ) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-याचा जातीचा दाखला जोडला आहे ? : होय / नाही

ब) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्र जोडले आहे ? : होय / नाही

क) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र जोडले आहे ? : होय / नाही

ड) उन्नत /प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) जोडले आहे ? (VJNT, SBC ,OBC प्रवर्गातील उमेदवारासाठी बंधनकारक) होय / नाही

१८.अ) शैक्षणिक पात्रता : (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात)

| परिक्षेचे नांव | शाळा / मंडळ / विद्यापीठ / संस्था | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकूण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

ब) १) शिकाऊ उमेदवारी कोणत्या व्यवसायात पुर्ण केली : वीजतंत्री/तारतंत्री (योग्य त्या ठिकाणी ☑ अशी खुण करावी)
२) शिकाऊ उमेदवारीचा कालावधी : पासून पर्यंत
३) शिकाऊ उमेदवारी पुर्ण केलेल्या संस्थेचे नांव :

१९. अनुभव :

| अ.क्र. | कार्यालयाचे / विभागाचे संपूर्ण नाव व पत्ता | पदनाम | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | कामाचा स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या मुख्य अभियंता, -------- यांच्या कार्यालयाने प्रस्तुत पदासाठी दिलेली जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून, ती चुकीची वा खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरिता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. याबाबत निवड समिती/नियुक्ती अधिकारी/कंपनीचा निर्णय मला बंधनकारक राहील. या खोटया माहितीच्या आधारे मला नोकरी देण्यात आली असल्यास ती गमविण्यांस मी ग्राहय राहील. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ:**

**दिनांक:**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

------------------------------------------------------------------------------------------

## विवाहित असल्यास लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

मी, श्री/श्रीमती ------------------------------ श्री.------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ------------- वर्षे, राहणार ----------------------------यादृारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतों/करते, की

१) मी -------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
२) आज रोजी मला---------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------- एवढी आहे.
३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**स्थळ :**

**दिनांक** : **उमेदवाराची स्वाक्षरी**

---

### अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.

१) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (School Leaving Certificate)
२) एस.एस.सी.पास झाल्याची गुणपत्रीका (Marksheet)
३) एस.एस.सी.पास झाल्याचे प्रमाणपत्र (Certificate)
४) शिकाऊ उमेदवारी पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र
४) अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र
५) जातीचे प्रमाणपत्र
६) जात वैधता प्रमाणपत्र
७) प्रगत /उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र
८) अधिवास (Domicile) प्रमाणपत्र
९) रोजगार विनिमय/आदिवासी प्रकल्प/जिल्हा सैनिक कार्यालयातील नोंदणी दाखला
१०) आयटीआय उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र

**स्थळ** **उमेदवाराची स्वाक्षरी**

**दिनांक**

(i)(a) Blindness: "Blindness" refers to a condition where a person suffers from any of the following conditions, namely :-

(i) total absence of sight; or

(ii) visual acuity not exceeding 6/62 or 20/200 (snellen) in the better
(iii) eye with correcting lenses; or

(iv) limitation of the field of vision subtending an angle of 20 degree
(v) of worse;

(b) Low vision: "Person with low vision" means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refractive correction but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device.

(ii) Hearing Impairment:- "Hearing Impairment" means loss of sixty decibels or more in the better car in the conversational range of frequencies.

(iii)(a) Locomotor disability : "Locomotor disability" means disability of the bones, joints or muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy.

(b) Cerebral Palsy : "Cerebral Palsy" means a group of non-progressive conditions of a person characterized by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occurring in the pre-natal, peri-natal or infant period of development.

(c) All the cases of orthopaedically handicapped persons would be covered under the category of "locomotor disability or cerebral palsy."